“पतंजलीच्या विविध उत्पादनासंबंधी ग्राहक समाधानाचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ : लातूर जिल्हा”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्य विद्याशाखांतर्गत पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

संशोधक

जगताप सारीका सोनाजीराव

(एम.कॉम.,सेट)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.एच.डब्लू कुलकर्णी

(एम.कॉम, एम.फिल., पीएच.डी.)

वाणिज्य विभागप्रमुख

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

ऑगस्ट 2023

प्रस्तावना :

रामदेव आणि बालकृष्ण यांनी पतंजली आयुर्वेद कंपनीची स्थापना 2006 साली केली. पतंजली कंपनी ही आयुर्वेदिक वस्तुचे उत्पादन करणारी कंपनी आहे. पतंजली आयुर्वेद कंपनीकडून आयुर्वेदिक औषधे, सौंदर्य प्रसाधने, खाद्य पदार्थ, घरगुती उपयोगाचे उत्पादने इ. उत्पादन करते. पतंजली आयुर्वेद लिमिटेड ही पूर्णत: स्वदेशी कंपनी आहे. या कंपनीद्वारे ज्या वस्तू उत्पादित केल्या जातात त्या सर्व नैसर्गिक गोष्टीपासून व वनस्पतीपासून बनवल्या जातात.

पतंजली आयुर्वेद कंपनीने सुरूवातीला औषधांचे उत्पादन केल्यानंतर या कंपनीने खाद्य पदार्थ उत्पादित केले व त्यानंतर सौदर्य प्रसाधनांचे उत्पादन करायला सुरूवात केली. पतंजली आयुर्वेद कंपनीने ग्राहकांना विश्वास दिला. पतंजली आयुर्वेद द्वारे उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तु या लोकांसाठी फायदेशीर आहेत. आणि त्या पुर्णपणे आयुर्वेदिक आहेत. या कंपनीद्वारे ज्या वस्तुचे उत्पादन केले जाते. त्यात कोणतेही रसायन नाही. ज्याचा ग्राहकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होईल. त्यामुळे आज भारतातील प्रत्येक घरात पतंजली आयुर्वेद कंपनीचे उत्पादने पहावयास मिळतात.

पतंजलि आयुर्वेद कंपनी 900 पेक्षा जास्त वस्तु उत्पादित करते. त्यात 30 प्रकारचे खाद्य पदार्थ, 45 प्रकारची सौंदर्य प्रसाधने समाविष्ट आहेत. वैयक्तिक देखभाल, खाद्य पदार्थ आणि इएमसीजी हे पंतजली आयुर्वेदचे मुख्य उत्पादन आहेत. या कंपनीद्वारे 300 प्रकारचे आयुर्वेदिक औषधांचे उत्पादन केले जाते. हे 300 प्रकारचे औषधे तयार करण्यासाठी पंतजली कंपनीकडून नैसर्गिक घटकांचाच वापर केला जातो. हे औषधे सर्दी व ताप, पित्त, वात, शुगर, वजन कमी करण्यासाठी इ.अशा विविध आजारापासून मुक्तता करण्यासाठी उपयोगी आहेत.

पतंजली आयुर्वेद कंपनी स्थापन करण्यामागचा रामदेवबाबाचा हेतू आरोग्यपूर्ण समाज निर्माण करणे आहे. ह्या कंपनीची मुख्य संपत्ती ही शेतकरी वर्ग आहे. कारण

शेतकऱ्याकडून त्यांना उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल पुरवला जातो. ही कंपनी शेतकऱ्यांसोबत करार करते आणि शेतकरी या कंपनीला सेंद्रिय माल पुरवतात. या कंपनीशी शेतकऱ्यांनी करार केल्यामुळे त्याच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते. आणि ही वाढ दिवसेंदिवस वाढत जात आहे. कारण या कंपनीच्या विक्रीमध्ये वाढ होत आहे. आणि त्यामुळे उत्पन्नात पण वाढ झालेली दिसून येते.

तक्ता क्र.1.1

पतंजली कंपनीचे वर्षनिहाय उत्पन्न

वर्ष	**उत्पन्न (करोड रु.)**
2010-11	1000
2011-12	300
2012-13	841
2013-14	1184
2014-15	2006
2015-16	8000
2016-17	10,526
2017-18	9500
2018-19	8330
2019-20	30,000
2020-21	9089
2021-22	24284.38
2022-23	31821.45

पतंजली आयुर्वेद लिमीटेडची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

इ.स.1997 मध्ये औषधे तयार करून विक्री करणे या उत्पादनापासून पंतजलीची सुरूवात होवून रामदेव आणि बालकृष्ण यांनी पतंजली आयुर्वेद कंपनीची स्थापना 13 जानेवारी 2006 मध्ये केली. या कंपनीला कंपनी कायदा 1956 नुसार स्थापन केले. पतंजली आयुर्वेद कंपनी लिमिटेडचे नोंदणीकृत कार्यालय हे नवी दिल्ली

येथे असून त्याचा पत्ता डी-26, पुष्पांजली विजवासन एन्क्लेव्ह, नवी दिल्ली-110061 आहे. जरी कार्यालय दिल्ली येथे असलेतरी प्रत्यक्ष उत्पादन हे हरिद्वार, उत्तराखंड येथे होते. पतंजली आयुर्वेद कंपनी ही 2006 ला खाजगी मर्यादित कंपनी म्हणून स्थापन झाली. आणि 2007 साली ती सार्वजनिक मर्यादित कंपनी झाली.

पतंजलि आयुर्वेद कंपनीचे अधिकृत भांडवल रू 5000 लाख आहे.आणि 82.642422% मागवलेले भांडवल आहे. जे रू 4132.32 लाख आहे.17 नोव्हेंबर 2017 रोजी पतंजली आयुर्वेद लिमीटेड कंपनीची शेवटची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली.

राम भरत, स्वामी मुक्ता नंदा, अजय कुमार आर्य, आचार्य बालकृष्ण, राकेश मित्तल, सुमेधा, यज देव आर्य आणि विज्ञान दिप शर्मा हे सध्याचे बोर्ड संचालक व सदस्य आहेत.

संशोधन साहित्य पुनरावलोकन :-

डॉ.हेमंत जे.कोटोले (2018) :- पतंजली वस्तुप्रति ग्राहक वर्तुणुक एक अभ्यास या अभ्यासासाठी संशोधकाने पुणे शहरातील 1500 नमुन्याची निवड (snowball) नमुना पद्धतीने केली आहे. आणि माहिती संकलन केल्यानंतर त्याचे (analyses) केल्यानंतर संशोधनात समोर आले की, जो ग्राहक पतंजली उत्पादन खरेदी करतो. तो पुन्हा पुन्हा पतंजली कंपनीच्या वस्तू खरेदी करत आहे आणि तो समाधानी आहे.

उमेश मैया (2020) :- ग्राहकांनी पतंजली उत्पादनाबद्दल असलेले दृष्टीकोन विशेष संदर्भ उडपी या संशोधनात संशोधकाने उड्डपी जिल्ह्यातील 200 ग्राहक नमुना म्हणून साधा यादृच्छिक नमुना पद्धतीने निवडले आहेत. प्राथमिक माहिती ही प्रश्नावलीद्वारे जमा केली असून तथ्य संकलनानंतर माहिती विश्लेषण केल्यानंतर संशोधकाने असा निष्कर्ष काढला की, प्रत्येक ग्राहकाचे घातक रसायन वापरून उत्पादित केलेल्या वस्तुपेक्षा आयुर्वेदिक वस्तू खरेदी करताना दिसले.

पुनम रावत, डॉ.परिक्षित काळे (2021) :- पतंजली उत्पादनाबाबत महिलांची धारणा आणि प्राधान्य याचा अभ्यास या संशोधकान संशोधनासाठी हरिद्वार आणि हरिद्वार जवळील पतंजलीचे दुकान जेथे आहे. ते ठिकाण संशोधनासाठी निवडले आहेत. तसेच 130 महिलांची नमुना निवड केली आहे. प्राथमिक माहिती संकलन करण्यासाठी प्रश्नावली चा वापर करून जमा केली. माहिती विश्लेषणानंतर संशोधकाच्या असे निर्देशनास आले की, पंतजली आयुर्वेद कंपनीने महिला ग्राहकांच्या मनात चांगली प्रतिमा निर्माण केली आहे.

बल्लव निरौला, अच्युत गवळी (2020) :- पंतजली उत्पादनाचे वैशिष्ट्ये आणि ग्राहक समाधान विशेष संदर्भ काठमांडू, नेपाल या संशोधनासाठी सोईस्कर नमुना निवड पद्धतीने 300 नमुना निवड केला. पंतजली वस्तुचे वैशिष्ट्ये हे ग्राहकांच्या समाधानावर परिणाम करते असे या संशोधकाने आपल्या संशोधनात मांडले आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

पतंजली आयुर्वेद उत्पादनाच्या उपभोगानंतर ग्राहक समाधानी आहेत का? हे समजण्यास मदत होणार आहेत. पंतजली उत्पादनाबाबत ग्राहकांची निष्ठा समजण्यास मदत होणार आहे. या संशोधनामुळे ग्राहकांच्या समस्या व तक्रारी जाणून घेता येणार असून त्या तक्रारी व समस्या सोडवून ग्राहकांना समाधानी करून नवीन ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी हे संशोधन मदत करेल.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

1) सदरील विषयाच्या अभ्यासात फक्त लातूर जिल्ह्यातील ग्राहकांचा अभ्यास केला जाणार आहे.

2) संशोधन अभ्यासामध्ये फक्त पंतजली आयुर्वेद उत्पादनाचा अभ्यास केला जाणार आहे.

3) संशोधन अभ्यास 2023 ते 2026 पर्यंत पूर्ण केला जाणार आहे.

4) अभ्यासाअंती येणारे निष्कर्ष हे फक्त लातूर जिल्ह्यातील ग्राहकांना नावापुरतेच असतील. तसेच ते 2015-2025 या कालावधीशी मर्यादित असतील.

विषय अभ्यासाचे उद्दिष्ट्ये :-

1) पतंजली उत्पादन उपभोगानंतर ग्राहक समाधान जाणून घेणे.

2) पतंजली विविध उत्पादन खरेदी करण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

3) पतंजली उत्पादनाबाबत ग्राहकांची निष्ठा जाणून घेणे / अभ्यास करणे.

4) पतंजली उत्पादनाबाबत ग्राहकांच्या समस्या व तक्रारी जाणून घेणे.

5) पतंजली उत्पादनाची गुणवत्ता व किंमत याचा ग्राहकांच्या खरेदीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

6) पतंजली उद्योगाच्या वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

विषय अभ्यासाची गृहितके :-

1) पतंजली उत्पादनाच्या उपभोगानंतर ग्राहक समाधानी आहेत.

2) पतंजली उत्पादनाप्रति ग्राहकांची सकारात्मक निष्ठा आहे.

3) पतंजली उत्पादनाच्या गुणवत्तेचा व किंमतीचा ग्राहकांच्या खरेदीवर परिणाम होतो.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम सामुग्रीचा वापर केला जाईल.

प्राथमिक सामुग्री :-

प्राथमिक माहिती संकलन करण्यासाठी मुलाखत, प्रश्नावली व सूचीचा वापर करून प्राथमिक माहिती संकलन केली जाईल.

दुय्यम सामुग्री :-

दुय्यम माहितीचे संकलन पतंजली कंपनीचे अहवाल, संदर्भ ग्रंथ, शोधप्रबंध, प्रकाशित ग्रंथ, मासिके, इंटरनेट इ. माध्यमातून माहिती संकलन केली जाईल.

नमुना निवड :-

संशोधन अभ्यास विषय हा लातूर जिल्हापुरता मर्यादित असल्यामुळे लातूर जिल्हयातील 1000 ग्राहक नमुना म्हणून निवडण्यात येणार आहेत. पेस्ट, औषधे, साबण, जेल, सौंदर्य प्रसाधने, तुप, खाद्य तेल, धूप व अगरबत्ती, घरगुती वापराच्या वस्तू, झंडू बाम इत्यादी वरील 10 पतंजली उत्पादन विक्री आणि ग्राहक समाधानाची संशोधन अभ्यासासाठी निवड करण्यात आली आहे. आर्थिक अडचण, मनुष्यबळाचा अभाव आणि वेळेची कमतरता याचा विचार करून लातूर जिल्हयातील 10 तालुके अभ्यासासाठी निवडण्यात आलेले आहेत. लातूर जिल्हयातील 10 तालुक्यातील निवडलेले नमुने पुढीलप्रमाणे

तक्ता क्र.1.2

नमुना निवड

अ.क्र.	तालुक्याचे नाव	नमुना संख्या
1	लातूर	100
2	उदगीर	200
3	अहमदपूर	200
4	चाकूर	150
5	औसा	100
6	निलंगा	50
7	रेणापूर	50
8	देवणी	50
9	शिरुर अनंतपाळ	50
10	जळकोट	50
	एकूण	**1000**

नमुना निवड दर्शविणारा आलेख



सांख्यिकीय तंत्र :-

प्राथमिक व दुय्यम पद्धतीने माहिती गोळा केल्यानंतर सांख्यिकीय माहिती वर्गीकरण व विश्लेषण करून विविध प्रकारच्या सांख्यिकीय तंत्रामध्ये कोष्टके, आलेख, टी-टेस्टचा वापर करण्यात येईल.

प्रकरण रूपरेषा

1)	प्रकरण पहिले	:-	प्रस्तावना
2)	प्रकरण दुसरे	:-	संशोधन साहित्य पुनरावलोकन
3)	प्रकरण तिसरे	:-	लातूर जिल्हयाची ओळख
4)	प्रकरण चौथे	:-	माहिती संकलन व विश्लेषण
5)	प्रकरण पाचवे	:-	निष्कर्ष, शिफारशी व उपाययोजना

संदर्भ

1) Dr.Hemant J. Kotole:- A Study of consumer behavior of Patanjali product. Indian Journal of Research, volume - 7 Issue - January - 2018, ISSN No 2250-1991, Page - 7.

2) Umesh Maiya :-Consumer perception toward Patanjali product A study with A Reference to Udpi District Asia pacific Journal Research.

3) Poonam Ravat, Dr. Parikshitkale :-A Study of women perception & Preference toward Patanjali product. Journal of University of Shanghai for science & Technology, Volume-23, Issue 7 July 2021 ISSN No.0076735 Page - 591.

Websites:-

1) www.patanjaliayurved.net
2) www.patanjaliayurved.org
3) www wikipedia.org

संशोधक
सारिका सोनाजीराव जगताप
(एम.कॉम.सेट)

मार्गदर्शक
डॉ. एच. डब्ल्यू. कुलकर्णी
(एम.कॉम, एम.फिल, पीएच.डी)
वाणिज्य विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर